# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना
# नवजीवन विधी महाविद्यालय
# शिवशक्ती चौक, त्रिमुर्ती चौक जवळ, सिडको, नाशिक - ४२२ ००८.

**युवक व खेळ मंत्रालय, भारत सरकार, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने आषाढी वारी निमित्त वारी.**







- **राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम**
  **अधिकारी यांचे नाव** :- सौ. डॉ. शालिनी एस. घुमरे (पेखळे)
- **राष्ट्रीय सेवा योजनाचे विद्यार्थी :-**
  १) कुनाल लोटन बैसाणे (B.A.LLB)
  २) संकेत सुर्यभान चव्हाण (B.A.LLB)



# लेकर तुझीचं रे आम्ही ...

आषाढीचा सोहळा... वारी एकतरी अनुभवावी याची देही याची डोळा... चंद्रभागेतीरी भरे वैष्णवांचा मेळा... अशीही वारी यंदा "लोकशाही वारी" म्हणून आम्ही सर्व विद्यार्थ्यांनी अनुभवली. वैष्णवांचा मेळा चंद्रभागेतीरी भरला यंदा स्वच्छ वारी – स्वस्थ वारी – निर्मळ वारी – हरीत वारी आणि लोकशाही वारी यारुपाने पार पडली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रिय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ व स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या विभागा तर्फे व नवजीवन विधी महाविद्यालयाच्या वतीने आम्हा दोघा विद्यार्थांना पायी वारीचा हा अदभूत सोहळा अनुभवता आला. मी प्रथमच आणि कुटुंबातील पहिला व्यक्ती आहे की मला वारी संधायला मिळाली.

विद्यापीठ ते पंढरपूर असा साधारण २०० कि.मी. चा प्रवास तेही पायी करण्याची मजाच काही वेळली आहे तो सगळा अनुभव शब्दबध्द करणं थोडसं अवघड आहे. मात्र, अनुभव फार मोठा आहे. अवघा रंग एकची झाला... याप्रमाणे ना-जात पाहिली जाते, ना-रंग, ना-वय आणि नाही धर्म आस एक ध्यास एक विश्वास एकचं आणितो म्हणजे विठ्ठल विठ्ठल. निसर्गाशी गप्पा मारत निसर्गाचा आनंद घेत आणि निसर्गालाच अनुभवत निसर्गाच्या साक्षीने आणि सोबत वारीची मजाव्च न्यारी.

यंदा "लोकशाही वारी" ही नवीन संकल्पना होती. ती आम्ही सर्व स्वयंसेवकांनी वारी मध्ये लोकशाही वारी हि संकल्पना नाही तर तो तुमचा वा आमचा हक्क आहे ही कार्यवाही आहे असा संदेश आम्ही ठीकठीकाणी सर्व वारी लोक व वारीत लागणारे गावी तेथे आम्ही हा संदेश हा उपक्रम पोहचवत आणि राबवत होतो. आम्ही जेथे जेथे जात तेथे तेथे पथनाट्य, भारुड व जनजागृती करत होतो. तेथे माझा एक अनुभव असा की मी थोडक्यात मांडतो, लोणंद मध्ये आम्हाला एक सर्वे करण्यात सांगितला तो थोडक्यात असा की, वारीमधे चालण्याऱ्या लोकांशी संवाद साधायचा यासाठी हा सर्वे त्यात सहा विषय त्यात माझा आवडता विषय तो म्हणजे उद्योजकता हा विषय असा आहे की भांडवल न टाकता ही उद्योग आपण करु शकतो अस मला वारी मध्ये खूप अनमोल गोष्ट कळाली. तर तो असा की एक माणूस संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी मध्ये किंवा पालखी सरकली की वारकरी सुध्दा पुढे सरकता त्यात अस की वारकरी जेथे जात तेथे तेथे घाण वैगरे होती तर त्यात अस होत कि, पाण्याची बॉटल वारकरी ती पिऊन तेथे टाकत तेथे तर तो माणूस ती रीकामी पाण्याची बॉटल तो उचलत आणि ते एक भंगाराच्या दुकानात पोत भर त्या पाण्याची बॉटल विकत होता., तर तो माणूस असा म्हणाला की, मी रोजचा १००० ते १,५०० रुपये कमवतो. म्हणजे न भांडवल टाकता ही उद्योग., त्यात मी त्याला असं विचारलं की, तुम्हाल घाण नाही वाटत का? कि तुम्ही खुप घाणीत सुद्धा काम करता? तर त्याच उत्तर असं कि, पोटापाण्यासाठी काहीही करायच आणि शिवाय माऊलींच्या वाटेवर काम करत आहे मला पुण्य सुध्दा लाभत आहे त्यामुळे मला कसलच घाण वाटत नाही व तो जातांना असं म्हणाला कि, "कोई भी काम छोटा नही होता, और धंधें से बडा कोई धर्म नही होता". असं तो माणूस सांगून तेथून निघून गेला.

ज्ञानोबा – तुकोबाच्या गजरात टाळ - मृदूंगाच्या तालावर, रिंगणाच्या साथीने एक एक पाउल शिस्तीने पुढे सरकते ते फक्त विठ्ठलाच्या दर्शनासाठीच. कळस दिसला तरी हा ध्यास पुर्ण होतो अशी ही जगात भारी आमची वारी आषाढीच्या दिवशी विठ्ठलाच्या दर्शनाने संपूर्ण झाली. काय शिकवते वारी? का करावी वारी? शांत, संयम आणि शिस्तीचं प्रतिक आहे वारी स्वत: मधील "स्व" चा शोध घेण्यासाठी करावी वारी. वारी करते समृध्द नाही तेथे कोणता भेदाभेद. आयुष्यातील सर्व प्रश्नांची उत्तरं आहेत वारीत. धन्य तो विठोबा धन्य ती वारी.

विठ्ठल-रकुमाईच्या चरणी लीन होतो वारकरी पाहता कळस धन्य ते दर्शन अशीही वारी एकदा तरी अनुभवावी!

**विठ्ठल – विठ्ठल जय हरी विठ्ठल ...**

**राष्ट्रीय सेवा योजना**
**कार्यक्रम अधिकारी यांचे नाव** :- सौ. डॉ. शालिनी एस. घुमरे (पेखळे)

--------------------------

- **राष्ट्रीय सेवा योजनाचे विद्यार्थी** :-

१) **नाव :-** कुणाल लोटन बैसाणे (**B.A.LLB**)

२) **नाव :-** संकेत सुर्यभान चव्हाण (**B.A.LLB**)